**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अमरावती कृषी हवामान सल्ला** — **मंगळवार दिनांक – १९.११.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २० ते २४ नोव्हेंबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २०/११ | २१/११ | २२/११ | २३/११ | २४/११ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३० | ३० | ३१ | ३० |
| किमान तापमान (अं.से.) | १६ | १६ | १६ | १६ | १७ |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५८ | ५८ | ५९ | ५९ | ५५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ४५ | ४८ | ५० | ५० |
| वा-याचा वेग (किमी / तास) | २ | २ | २ | १ | १ |
| वा-याची दिशा | ५२ | ७२ | ७६ | ६७ | ५४ |

| हवामानाचा इशारा | सध्यस्थितीत जिल्यात दिनांक २०-२४ नोव्हेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व पिक | पेरणी | रब्बी पिकांची पेरणी नोव्हेंबर २०- २५ नोव्हेंबर पर्यंत केल्यास हरकत नाही. पेरणीसाठी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वाणांना प्राधान्य द्यावे. |
| कपाशी | पात्या / बोंड | कपाशी पिकात दर आठवडयाने पिकामध्ये शेंदरी बोंडअळीचा सर्वेक्षण करून मजुराच्या सहायाने डोमकळया वेचून अळया सहित नष्ट कराव्या. उपलब्धते प्रमाणे त्वरीत किमान एकरी दोन फेरोमाने सापळे लावावे. सापळयातील अडकलेले पतंग किमान दर आठवडयाने नष्ट करावे व आवश्यकते नुसार २० ते २५ दिवसातून एकदा त्यातील वडी (ल्युर) बदलावी. पिकावर ५ % निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी किवां वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना पर्यावरणनिष्ठ व्यवास्थापनासाठी मेटारायझीयम अनिसोपली ५० ग्रॅम (२ x $१०^{८}$ CFU) ग्रॅम किंवा ब्यूव्हेरिया बँसीयाना १.१५ टक्के (२ x $१०^{८}$ CFU) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. |
| सोयबीन | - | सोयाबीन मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. साठवणूक करतांना बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के पेक्षा जास्त नसावे. |
| तूर | फुल धारणा अवस्था | तूर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या सर्वेक्षण व व्यवस्थापनासाठी तुरी पिकाचे नियमित निरिक्षण ठेवावे. पिका मध्ये एकरी किमान दोन ते तीन कामगंध सापळे लावावे. या सापळया मध्ये अडकलेले नरपतंग वेळो वेळी काढून नष्ट करावे तसेच विशिष्ट कालावधीत वड्या (ल्युर) बदलणे अनिवार्य आहे. शेतकरी बंधूनी फवारणी करतांना योग ती सर्व काळजी घ्यावी.पाने गुंडाळणारी अळीच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी किवां वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना पर्यावरणनिष्ठ व्यवास्थापनासाठी मेटारायझीयम अनिसोपली ५० ग्रॅम (२ x $१०^{८}$ CFU) ग्रॅम |

| | | |
|---|---|---|
| | | किंवा ब्यूव्हेरिया बँसीयाना १.१५ टक्के (२ x १०⁸ CFU) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी पिके | पेरणी | बागायती हरभऱ्याची (जाकी ९२१८, पीडीकेव्ही कांचन) पेरणी नोव्हेंबर १५ पर्यंत केल्यास हरकत नाही.<br>हरभरा पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबियम व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.<br>वेळेवर गव्हाची पेरणी करण्याकरिता योग्य वाणाची निवड करून (विमल, पूर्णा, एचडी २३८०, एचडी २१८९) २५ नोव्हेंबर दरम्यान बीज प्रक्रिया करून पेरणी करावी. |
| करडई | वाढ | संरक्षित ओलिताखाली करडई पिकाची आंतरमशागत करावी. |
| फळझाडे | वाढ | मृग बहारातील फळांची वाढ वेगाने होण्याकरिता जिब्रेलिक ॲसिड १५ पीपीएम + मोनो-पोटॅशियम फॉस्फेट १% (१ किलो) १०० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी. |
| पशु व पक्षी | | जनावरांसाठी लिव्हर फ्ल्यू रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना जंताचे औषध द्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.